निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९५ वा.
गुरूवार - १८ सप्टेबंर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना’ चा किनगाव येथे राज्यस्तरीय शुभारंभ

## १ कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** प्रत्येक गावात जिल्हा बँकेमार्फत लाडक्या बहिणींना बिनव्याजी एक लाख रुपयांचे कर्ज देऊन त्यांना शासन आर्थिक पाठबळ देईल. त्यातून उद्योग व्यवसाय करुन त्या स्वावलंबी होतील. राज्यातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी करण्याचा संकल्प असल्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना’ चा राज्यस्तरीय शुभारंभ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील किनगाव (ता. फुलंब्री) येथे झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दि.१७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ राबविले जाणार आहे. किनगाव येथील देवगिरी सहकारी साखर कारखान्याच्या आवारात आयोजित या सोहळ्यास राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, खासदार डॉ. कल्याण काळे आणि संदीपान भुमरे, आमदार सर्वश्री संजय केणेकर, प्रशांत बंब, रमेश बोरनारे, आमदार श्रीमती अनुराधा चव्हाण, आमदार श्रीमती संजना जाधव तसेच ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, तसेच आदर्श गाव हिवरेबाजारचे सरपंच पोपटराव पवार, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे, पाणी फाऊंडेशनचे अविनाश पोळ आदी मान्यवर उपस्थित होते.

**लोकसहभाग अभियानाचा गाभा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला उपस्थितांना मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मराठवाड्याची दुष्काळापासूनही मुक्ती करु असा निर्धार व्यक्त करुन श्री. फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे योजनांची अंमलबजावणी करुन लाभ देण्याचे अभियान तर आहेच, मात्र हे प्रत्येक ग्रामस्थाला स्वाभिमानाने जगायला शिकवणारे अभियान आहे. लोकसहभाग या अभियानाचा मूळ गाभा आहे.

**लाडक्या बहिणींना उद्योग व्यवसायासाठी अर्थसहाय्य**

श्री. फडणवीस म्हणाले की, आमच्या लाडक्या बहिणी यांना केवळ १५०० रुपयांवर अवलंबून रहावे लागू नये, त्यांना महिला बचत गटांच्या माध्यमातून उद्योग व्यवसायासाठी अर्थसहाय्य देऊन लाडक्या बहिणींना सक्षम करण्यात येईल. प्रत्येक गावात लाडक्या बहिणींची एक पतसंस्था सुरु करुन जिल्हा बँकेमार्फत त्यांना १ लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन त्यांच्या पाठीशी शासन उभे राहील. अशाप्रकारे राज्यातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दिदी बनवणार,असा संकल्प मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.




**पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात लोकांच्या जीवनात परिवर्तन**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त ’सेवा पंधरवडा’ राबविण्यात येत आहे, त्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरु करण्यात आले आहे. पंतप्रधानाच्या नेतृत्वात देशाने प्रगती केली असून २५ कोटी लोक गरिबीच्या रेषेखालून वर आले आहेत. आज १५ कोटी लोकांना स्वत:चे घर उपलब्ध होऊ शकले. लोकांच्या जीवनात परिवर्तन आले, हे सगळे पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात घडलं, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**२८ हजार ग्रामपंचायती विकासाचे मॉडेल बनविणार**

ग्रामविकासाच्या अनेक योजना, अभियाने आलीत पण त्यात ठरविक गावेच पुढे गेली. आता या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातून प्रत्येक गावांगावांतून समृद्ध महाराष्ट्र घडेल. अशा स्पर्धांमध्ये कोणतेही गाव मागे राहू नये यासाठी हे अभियान सुरु केलं आहे. या अभियानात केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व योजना गावात राबविण्यात येतील. त्या माध्यमातून राज्यातील २८ हजार ग्रामपंचायती आणि ४० हजार गावे मॉडेल म्हणून विकसित करू, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

**सहकारालाही बळकटी**

या योजनेचे प्रमुख सात स्तंभ आहेत.त्याद्वारे सुशासनयुक्त पंचायत, प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचविणे, जल समृद्ध गावे करणे, प्रत्येक गाव स्वच्छ आणि जलसमृद्ध करणे, वृक्षारोपण, गावाच्या विकासासाठी मनरेगा आणि अन्य योजनांचे अभिसरण करण्यात येईल. गावातील अर्थकारणाला बळकटी देण्यासाठी संस्थांचे बळकटीकरण करतानाच गावातील सेवा संस्थांना १७ उद्योग, व्यवसाय देऊन त्याद्वारे सहकारालाही बळकटी देऊ, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

**२५० कोटींची पारितोषिके देणारी पहिलीच योजना**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या ग्रामपंचायतींना तब्बल २५० कोटी रुपयांचे पारितोषिके दिली जाणार आहेत. इतकी पारितोषिके देणारी ही देशातील पहिलीच योजना आहे.

**सुप्त शक्तीची आठवण करुन देण्यासाठी अभियान**

या अभियानामुळे वंचित घटकांच्या जीवनात बदल घडवू. त्यासाठी लोकसहभाग महत्वाचा आहे. गावात एकजूटीने राहून आपण समृद्धी आणू. राज्यातील अनेक गावांत लोक वेगवेगळे प्रयत्न करुन परिवर्तन घडवित आहेत. एआयचा कृषीत वापर केला जात आहे. आपल्या प्रत्येकामध्ये हे परिवर्तन घडविण्याची सुप्त शक्ती आहे. त्या सुप्त शक्तीची आठवण करुन देण्यासाठीच हे अभियान आहे. प्रत्येक ग्रामस्थाने हे अभियान आपले आहे असे समजून सहभाग द्यावा आणि सक्षम महाराष्ट्र घडवावा, आजपासून ही स्पर्धा सुरु झाली अशा शब्दात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थितांना आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केले. त्यांनी या अभियानाची सविस्तर माहिती दिली. या अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना तालुकास्तरावर प्रथम १५ लाख,द्वितीय १२ लाख आणि तृतीय ८ लाख, जिल्हास्तरावर प्रथम ५० लाख,द्वितीय ३० लाख आणि तृतीय २० लाख तर राज्यस्तरावर प्रथम ५ कोटी,द्वितीय ३ कोटी आणि तृतीय २ कोटी रुपयांची बक्षिसे मिळणार आहेत, असे त्यांनी सांगितले. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. ग्रामविकास मंत्री गोरे यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. या प्रसंगी श्री. फडणवीस यांच्या हस्ते लाभार्थ्यांना लाभ वितरण करण्यात आले. या अभियानाच्या संकेत स्थळाचे उदघाट्न करुन अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. तसेच अभियानाची माहिती देणाऱ्या व किनगावच्या विकासाच्या चित्रफितीचे विमोचन करुन त्याचे कार्यक्रमात प्रदर्शन करण्यात आले.

आदर्श गाव सरपंच पोपटराव पवार, पालकमंत्री संजय शिरसाट यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. तर प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी आभार प्रदर्शन केले. तर नीता पानसरे यांनी सूत्रसंचालन केले. जिल्ह्यातील सर्व ८८० ग्रामपंचायती या सोहळ्यात ऑनलाईन सहभागी झाल्या होत्या. तसेच यानिमित्त सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. आदल्या दिवशी म्हणजे दि.१६ रोजी राज्यभरात विशेष महिला ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

# पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी यांना वाढदिवसाची खरी भेट

## जालना महानगरात महा रक्तदान शिबिरात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## रक्तदान हेच खरे जीवनदान - भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर रोजी जालना येथे तेरापंथ युवक परिषद आणि भारतीय जनता पार्टी जालना महानगर तर्फे सामाजिक बांधिलकी जपत महा रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर आणि स्वच्छता अभियान या भव्य उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम गुरु गणेश भवन, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे पार पडला. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विजय कामड, विमलताई आगलावे, माजी जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा पांगारकर, भाजपा युवानेते अक्षय भैया गोरंट्याल यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिराला नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. शेकडो तरुण, महिला व कार्यकर्त्यांनी उत्साहाने रक्तदान केले. रक्तपेढ्यांच्या माध्यमातून जमा झालेले रक्त गरजूंना उपयोगी पडणार असून या उपक्रमामुळे समाजहिताचा मोठा संदेश गेला. आरोग्य तपासणी शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने नागरिकांची मोफत तपासणी केली. रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, डोळे आदी आजारांची तपासणी करून आवश्यक त्या उपचाराचे मार्गदर्शन करण्यात आले. या अभियानात कार्यकर्त्यांनी, युवकांनी व नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. परिसर स्वच्छ करून स्वच्छ भारत - स्वस्थ भारत या संकल्पनेला बळकटी देण्यात आली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तेरापंथ युवक परिषदेचे हर्षवर्धन सेठिया, विशाल मरलेचा, परेश धोका, ओम धोका, नीलेश समदरिया, आशिष सेठिया, परेशजी धोका तसेच भाजपा जालना महानगरचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत घेतली.

या प्रसंगी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशाला सेवा, प्रामाणिकपणा व विकासाचे नवे बळ दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान, आरोग्य तपासणी व स्वच्छता यांसारखे समाजोपयोगी उपक्रम राबवून आपण समाजसेवेचा संदेश देत आहोत. जनतेच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला असून अशा उपक्रमांतून समाज अधिक सबल व निरोगी बनेल.

संपूर्ण कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक बांधिलकी जपत मोदीजींच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान, आरोग्य तपासणी आणि स्वच्छता अभियान या तिन्ही उपक्रमांद्वारे जनजागृती व सेवा करण्याचा सुंदर संदेश जालना शहरभर पोहोचविण्यात आला.

यावेळी धनराज काबलिये, अर्जुन गेही, संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, सोपान पेंढारकर, चंपालाल भगत, राज स्वामी, जिवन सले, सुनील पवार, रमेश गौरक्षक, सिद्धिविनायक मुळे, अरुणाताई जाधव, सखुबाई पणबिसरे, ममता कोंडयाल, वर्षाताई ठाकूर, वंदना ढगे, वैशाली बनसोडे, दिपाली बिनीवाले, पुष्पा मेहेत्रे, शैलेजा निकाळजे, पूर्व जालना मंडळाध्यक्ष अमोल धानोरे, नवीन जालना मंडळाध्यक्ष सुनिल खरे, जुना जालना मंडळाध्यक्ष महेश निकम, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, प्रा.राजेंद्र भोसले, गोविंद भताने, सोमेश काबलीये, सोमनाथ गायकवाड, श्रीमंत मिसाळ, राजू गवई, महेंद्र अकोले, चेतन देसरडा, बाबुराव भवर, देविदास देशमुख, राजेश जोशी, शिवराज जाधव, हरिभाऊ गोरे, सतीश केळकर, डोंगरसिंग साबळे, सचिन मोहता, पंकज किल्लेदार, संजय माधव वाले, रोहित खोडवे, संतोष खंडेलवाल, विकास कदम, करण निकाळजे, उमेश अग्रवाल, कृष्णा खिल्लारे, डोंगरसिंग साबळे, रोहित खोडवे, निर्गुण वाढेकर, उमेश पेंढारकर, गौरव गोधेकर, काशिनाथ पवार, बबलू छडीदार आदींसह उपस्थिती होती.




# महाराष्ट्र हादरला! पंचनाम्यादरम्यान अधिकाऱ्याने झापल्याने शेतकऱ्याची विहिरीत उडी; गमावला प्राण..

**पैठण तालुक्यातील खादगाव येथे नेमकी काय घटना घडली?**
**संजय कोहकडे यांनी आत्महत्या का केली?**
**कोणत्या अधिकाऱ्यांचा या प्रकरणात सहभाग होता?**

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी/** राज्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी आणि पूरसदृष्य परिस्थितीमुळे मोठ्याप्रमाणात शेतमालाचं नुकसान झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी हवालदील होऊन स्वत:ला संपवल्याच्या घटना समोर येत असतानाच छत्रपती संभाजीनगरमध्ये अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सध्या राज्यातील राजकारणाच्या केंद्रस्थानी शेतकऱ्यांचा प्रश्न असून नाशिकमध्ये दोनच दिवसांपूर्वी शरद पवारांच्या राष्ट्रवादीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी मोर्चाचं आयोजन केलं होतं. या मोर्चामधून शरद पवारांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर फडणवीस सरकारने तातडीने निर्णय घ्यावा असा इशारा देताना आंदोलन अधिक तीव्र करण्यासंदर्भात भाष्य केलं. यावरुन भाजपाकडून आता शरद पवार कृषीमंत्री असताना काय झालं याची आकडेवारी मांडून टीका केली जात असतानाच प्रत्यक्षात शेतकरी आत्महत्यांचं सत्र सुरुच आहे. असाच एक प्रकार छत्रपती संभाजीनगरमधून समोर आलाय.




**अधिकाऱ्यांसमोरच विहिरीत मारली उडी**

शेतात नुकसानीचा पंचनामा सुरू असतानाच शेतकऱ्याने महसूल अधिकाऱ्यांसमोरच विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली आहे. पैठण तालुक्यातील खादगाव येथे ही हृदयद्रावक घटना घडली आहे. मयत शेतकऱ्याचं नाव संजय शेषेराव कोहकडे असे असल्याची माहिती समोर आली आहे. शेताच्या दोन्ही बाजूंने पाटाचे खोदकाम झाल्याने ४५ वर्षीय संजय कोहकडे यांना शेतात जाण्यासाठी रस्ताच उपलब्ध नव्हता. तसेच यामुळेच त्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचू लागले. त्यांनी याबाबत अनेकदा महसूल अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. मंगळवारी अधिकारी पंचनामा करत असताना संजय कोहकडे यांनी आपली व्यथा सांगितली.

**वाचवण्याचा प्रयत्न केला पण...**

आधीच नुकसान आणि अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देत असलेल्या या शेतकऱ्याचं म्हणणं ऐकून घेण्याऐवजी अधिकाऱ्यांनी संजय कोहकडेंनाच झापल्याने ते संतापले. त्यांनी या अधिकाऱ्यांसमोरच थेट विहिरीकडे धाव घेत अधिकाऱ्यांसमोरच विहिरीत उडी घेतली. काहींनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. पण मदत पोहोचेपर्यंत पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर गावात तणावपूर्ण शांतता असून शेतकऱ्यांबद्दल अधिकाऱ्यांनी थोडी संवेदनशीलता दाखवली असती तर आज शेतकऱ्याचा जीव वाचला असता असं स्थानिकांचं म्हणणं आहे. आता या प्रकरणामध्ये अधिकाऱ्यांविरोधात आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी कारवाई होणार का याबद्दलची चर्चा गावकऱ्यांमध्ये असल्याचं दिसत आहे.

**नाहीतर आत्महत्या पुन्हा वाढतील**

शेतकऱ्यांप्रती उदासीन सरकार असं यापूर्वी कधीच आलं नाही, असं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दोन दिवसांपूर्वी प्रसारमाध्यमांशी चर्चा करताना म्हटलं होतं. कर्जमाफी दिली नाही, सोयाबीनला भाव नाही, कापसाला भाव नाही आणि आता अस्मानी संकट आलं आहे. सोयाबीनचा तातडीने सर्वेक्षण करण्याची गरज आणि शेतकऱ्यांना मदत करण्याची गरज आहे. नाहीतर आत्महत्या पुन्हा वाढतील. सरकारने तातडीने पंचनामे करून तो मदत दिली पाहिजे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

# साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने जनसामान्यांची चळवळ.....

९९ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि पानिपतकार विश्वास पाटील यांची निवड यंदा बहुमताने करण्यात आली. साहित्यिकांच्या सरकारी पैशाने मिरवण्याचा उत्सव असे जे स्वरूप या उत्सवाला आले होते त्याला यंदा विश्वास पाटील यांच्यासारख्या समर्थ साहित्यिक आणि कादंबरीकाराच्या निवडीमुळे छेद दिला गेला, असे म्हणावे लागेल. विश्वास पाटील हे नाव साहित्य जगतात आदराने घेतले जाते. ते सनदी अधिकारी तर होतेच पण 'पानिपत','महानायक' आणि 'झाडाझडती' सारख्या काही प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्यांचे लेखकही आहेत. त्यामुळे साहित्यिक म्हणून त्यांचा दरारा कायम आहे. यापूर्वी काही अध्यक्ष होऊन गेले. मध्यंतरी साहित्य संमेलने नकोतच असे म्हणणारा गट निर्माण झाला होता. पण संमेलनं चालू आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत त्यांचे प्रत्येक लेखन हे आदरास पात्र असते. भले ते कुणाला आवडो अथवा न आवडो पण साहित्यिक म्हणून त्यांचे मूल्यमापन करता येईल. त्यादृष्टीने विश्वास पाटील यांची निवड ही अत्यंत योग्य आहे. साताऱ्यासारख्या शहरात होणाऱ्या संमेलनात ती यथार्थ आहे. साहित्य संमेलन आणि वाद काही नवे नाही. अगदी पहिल्या संमेलनात म्हणजे १८७८ साली झालेल्या साहित्य संमेलनात वाद गाजला होता, तो म्हणजे तेव्हाचे वंचितांचे पुढारी महात्मा जोतिबा फुले यांना आमंत्रण देऊनही ते स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला होता आणि त्यामुळे हा वाद गाजला होता. १९७५ च्या साहित्य संमेलनात तर दुर्गा भागवत यांनी मंत्री यशवतराव चव्हाण यांना व्यासपीठावर बसण्यास मनाई केली होती. त्यामुळे यशवंतराव तेव्हा सभागृहात बसले होते. साहित्य समेलनांना वादाची पार्श्वभूमी आहे. यापूर्वी झालेल्या साहित्य संमेलनात सरकारी हस्तक्षेपामुळे संमेलनच नको म्हणून ते गाजले होते. याला अपवाद गेल्या वर्षी दिल्ली येथे झालेल्या साहित्य संमेलनाचाही करता येणार नाही. कारण त्या संमेलनात सरकारी हस्तक्षेप सरळ सरळ दिसत होता. सरकारी हस्तक्षेपास कुणाचाच विरोध नाही, पण त्यालाही एक मर्यादा हवी. पण साहित्यिकच आपल्या माना जर राजकारण्याच्या हातात देणार असतील तर मग त्यांना दोष देता येणार नाही. आजवर असेच होत आले आहे. दुर्गा भागवतांसारखे अपवाद सोडले तर बरेचसे साहित्यिक सरकारपुढे नांग्या टाकणारे ठरले आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत तसे म्हणता येणार नाही. सरकारपुढे नांग्या टाकू नका. याचा अर्थ नेहमीच त्यांच्याविरोधात तलवारी उपसून बसा असेही नाही. पण योग्य वेळी आपला स्वाभिमान दाखवला पाहिजे.

विश्वास पाटील यांनी सरकारी नोकरी करताना वेळोवेळी तसा स्वाभिमान दाखवला आहे; परंतु विश्वास पाटील यांच्याबाबतीत असे वाद होण्याची शक्यता दिसत नाही, कारण त्यांचे साहित्यिक स्थान आज प्रचंड उंच आहे आणि त्यामुळे त्यांच्यावर कुणी प्रश्नचिन्ह उपस्थित करणार नाही. शिवाय विश्वास पाटील यांची निवड एकमताने झाली आहे. मुख्य प्रश्न हा आहे, की मराठी साहित्य वाचणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे आणि मराठी वाचन तर हल्ली दुर्मीळच झाले आहे. त्याबाबतीत विश्वास पाटील हे काही तरी करू शकतील. त्यांनीच सांगितले आहे, की नुसते एक गाव वाचनालयाचे म्हणून चालणार नाही तर गावोगावी वाचनालय चळवळ सुरू करावी लागेल. याबाबतीत विश्वास पाटील यांनी वर्षभराच्या मुदतीत काही तरी ठोस करावे हीच अपेक्षा त्यांच्याकडून आहे. आज मराठी साहित्यापुढे अनेक प्रश्न आहेत. मराठी शाळा बंद पडत आहेत आणि मराठी लोक महाराष्ट्रापासून दूर जात आहेत. परभाषिकांनी आक्रमण केले आहे आणि प्रत्येक क्षेत्रात मराठी लोक मागे हटत आहेत किंवा हटवले जात आहेत. याबाबतीत विश्वास पाटील यांनी चळवळ उभारावी हे अपेक्षित आहे. कारण त्यांनी वाचनालय चळवळ उभारण्याचे संकेत दिले आहेत तसेच ते मराठी शाळा वाचवण्यासाठी काही तरी करतील. प्रत्येक मराठी साहित्य संमेलनाने या अगोदर शब्द दिला होता. पण पुढे काहीही झाले नाही. मराठी वाचकांची संख्या फारच कमी आहे आणि आपल्याकडे ना. सी. फडके, आचार्य अत्रे वगैरे वाचणाऱ्यांची पिढी एकेकाळी होती, ती आता अस्तंगत झाली आहे.

नव्या पिढीला हॅरी पॉटर वाचण्याचे वेड आहे आणि तेही जाऊन आता मोबाइल आणि इतर गॅझेटेचे वेड आहे. त्यापासून नव्या पिढीला वाचवायचे कसे असा यक्षप्रश्न आहे. तो विश्वास पाटील आणि त्यांच्यासारख्या साहित्यिकांवर ही फार मोठी जबाबदारी आहे. कारण त्यांच्यावरच हे शिवधनुष्य पेलण्याची ताकद आहे आणि त्यांच्याकडे तितकी प्रतिभाही आहे.

विश्वास पाटील हे शेतकरी कुटुंबातून आलेले. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील नेर्ले येथे झाला. त्यांचे वडील चौथी पास होते, तर आईने शाळाही पाहिली नाही. त्यांचा विश्वास हा पुत्र आज सनदी अधिकारी म्हणून निवृत्त झाला. त्यांनी प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्या लिहिल्यात. 'पानिपत' आणि 'महानायक' ही सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावरील कादंबरी प्रचंड गाजली. शेतकरी कुटुंबातून आलेल्या विश्वास यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची दुःखे आणि वेदना यांचा जवळून परिचय होता, पुढे ते शासकीय सेवेत रुजू झाले तेव्हा त्यांच्या ते कामी आले. शासकीय सेवेत असताना त्यांनी शासकीय योजनांचा लाभ लोकांना कसा देता येईल हे पाहिले. पण त्यांच्या साहित्यिक योगदानाविषयी बोलताना असे म्हणता येईल, की त्यांची साहित्यिक वीण ही त्यांना कादंबरी लेखनाकडे घेऊन गेली. 'महानायक' असो की 'झाडाझडती' या सर्व कादंबऱ्यांतून उपेक्षित वर्गाची तडफड दिसते.

पानिपतचा अपवाद वगळता त्यांची ही उपेक्षितांची तडफड नेहमीच केंद्रस्थानी राहिली आहे. साहित्य संमेलन म्हणजे केवळ तीन दिवस मिरवण्याचा उत्सव ही प्रथा विश्वास पाटील बदलून टाकतील यात काही शंका नाही. साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने जनसामान्यांची चळवळ कशी होईल हे पाटील पाहतील यात शंका नाही. विश्वास पाटील यांच्या निवडीने एक सर्वोत्कृष्ट कादंबरीकार आणि साहित्यिकाची निवड झाली आहे. त्यांच्याकडून मराठी रसिकांना अपेक्षाही तितक्याच आहेत.

## बाबासाहेबांचे स्मारक जनतेच्या पैशावर भैय्यासाहेबांनी उभे केले, त्याच्या विस्तारासाठी समाजाने पुढाकार घ्यावा -डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नात रमा आंबेडकर तेलतुंबडे यांचे प्रतिपादन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** / महू ते मुंबई पर्यंत भीमज्योत काढून भैय्यासाहेबांनी जनतेच्या पैशावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई येथे स्मारक उभे केले, ज्यावेळी चैत्यभूमीची उभारणी केली जात होती त्यावेळी जनतेने स्वयंस्फूर्तीने आर्थिक मदत केली, भैय्यासाहेबांनी सरकारकडून, राजकीय पक्षांकडून मदत घेतली नाही, स्वाभिमानाने जेवढी मदत होत होती कार्यक्रमातुन बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संजय मून हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणुन सत्यशोधक समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. के.ई. हरिदास, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एस.आर. बोदडे, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. डी.व्ही. खिल्लारे, भारतीय बौद्ध महासभेचे इंजि. बी.जी. म्हस्के, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. यशवंत खडसे, वंचितचे राज्य प्रवक्ते तय्यब जफर आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी आपले मनोगत की, बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर भैय्यासाहेबांनी आंबेडकरी चळवळीची जबाबदारी समर्थपणे पेलली, धर्मांतरानंतर समाजाला बौद्ध धम्मप्रती जागृत करण्याचे त्यांना प्रशिक्षित करण्याचे कार्य त्यांनी भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून त्यांनी केले. त्यामुळेच बौद्ध समाजाची एकूण परिस्थिती सुधारली आहे. नव्या पिढीला भैय्यासाहेब समजावून सांगण्याची गरज असे त्या यावेळी म्हणाल्या.







तेवढे स्मारक उभे राहत होते, त्यामुळे आजचे चैत्यभूमीवरील स्मारक हे बाबासाहेबांच्या स्मारकाच्या मानाने खूप लहान दिसते, त्याचा विस्तार करण्यासाठी समाजाने भूमिका घेऊन पुन्हा एकदा लोकवर्गणीतून बाबासाहेबांचे जागतिक स्मारक निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, हीच खरी भैय्यासाहेबांना आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नात रमा आंबेडकर-तेलतुंबडे यांनी केले. त्या (दि. १७ सप्टेंबर रोजी) सूर्यपुत्र भय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर प्रतिष्ठानच्या वतीने सूर्यपुत्र भय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर यांच्या स्मृती दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण नाट्यमंदीर येथे आयोजित अभिवादन व्यक्त केले.

प्रास्ताविक करतांना सूर्यपुत्र भय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. भारत सिरसाट बोलतांना म्हणाले की, गेल्या १० वर्षापासून प्रतिष्ठानच्या वतीने भैय्यासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य समजावून सांगण्याचे काम व्यापक पद्धतीने आम्ही करीत आहोत.

प्रतिष्ठानच्या वतीने भैय्यासाहेब आंबेडकर यांच्यावर ग्रंथ प्रकाशित केला आहे, चळवळीचा इतिहास जिवंत ठेवण्याचे व तो लोकांसमोर मांडण्याची भूमिका प्रतिष्ठानची आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्ता उत्कर्षा रूपवते बोलतांना म्हणाल्या डॉ. संजय मून यांनी लेखक, साहित्यिक, विचारवंतानी भैय्यासाहेबांची दखल घेतली नसल्याबद्दल खंत व्यक्त करीत इतिहासकारांनी भैय्यासाहेबांना अनुल्लेखाने मारले असल्याची टीका त्यांनी केली. भैय्यासाहेब आंबेडकरी अत्यंत संघर्षातून, अत्यंत कठीण परिस्थितीतून आंबेडकरी चळवळीला उभारी देण्याचे काम केले आहे. सुत्रसंचालन अमरदीप वानखडे यांनी केले तर आभार अनंत भवरे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रतनकुमार साळवे, अनंत भवरे, रमेश पटेकर, राजन कीर्तने, अविनाश सावंत, रविंद्र गवई, गजानन लांडगे, राजेश शेगावकर, बाबुराव गवई, भाऊसाहेब गवई आदींनी परिश्रम घेतले.

## चिंचोली येथे कला विज्ञान महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम** / कन्नड तालुक्यातील ,कला व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती प्राथमिक माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचोली लिं




येथे मराठवाडा १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन सरदार वल्लभभाई पटेल उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आदरणीय डॉ. टी पी पाटील, साहेब

माजी शिक्षणाधिकारी, सुभाष बावस्कर, माजी पंचायत समिती सदस्य, तातेराव भुजंग सामाजिक कार्यकर्ते, प्राचार्य, श्रीमती खंडागळे मॅडम,मुख्याध्यापक योगेश काथार प्रवीण पाटील,चिंचोली लिं यांच्या प्रमुख उपस्थितीत, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून गावातील माजी सैनिक , साहेबराव सांडू पवार यांच्या हस्ते ध्वजारोण करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, पुरुषोत्तम मनगटे, यांनी केले. यावेळी प्राध्यापक व सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी ,व विद्यार्थी यांची उपस्थिती होती

## पाचोड येथे ग्रामीण भागातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी / शिवाभाऊ दौंड**/ पाचोड येथील महालक्ष्मी हॉस्पिटलच्या वतीने ग्रामीण भागातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे हे शिबिर दि.१८ सप्टेंबर गुरुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी दोन वाजेपर्यंत आसणार आहे

पाचोड येथील ग्रामीण व परिसरातील महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने एक महत्वाची संधी उपलब्ध झाली आहे. पाचोड येथील डॉ. अक्षय खरग व डॉ. शुभम खरग यांच्या महालक्ष्मी हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर खास करून ग्रामीण भागातील महिलांना लक्षात घेऊन आयोजित करण्यात आले असून, स्त्रियांच्या विविध आजारांवर तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे.

या शिबिरासाठी छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध तज्ञ डॉ.मनीषा इंगोले (वंध्यत्व निवारण व स्त्रीरोग तज्ञ) तसेच डॉ. प्रशांत इंगोले (वंध्यत्व निवारण व स्त्रीरोग तज्ञ) उपस्थित राहणार असून, ते महिलांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन करतील.

शिबिरात ज्या महिलांना बाळ होत नाही, मासिक पाळीचे विकार, जन्मजात दोष, गर्भाशयात गाठ किंवा पडदा असणे, वारंवार गर्भपात होणे अशा आजारांनी त्रस्त आहेत, त्यांच्यासाठी तपासणी व उपचारविषयक मार्गदर्शन केले जाणार आहे. त्याचबरोबर गरोदर महिलांसाठी प्रसूती काळातील काळजी, आहाराचे महत्त्व व आरोग्य संदर्भातील इतर मार्गदर्शन देखील तज्ञ डॉक्टरांकडून दिले जाणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील महिलांना तज्ञ डॉक्टरांची सेवा मोफत उपलब्ध करून देणे हा असून, अनेकांना याचा थेट फायदा होणार आहे. अशा प्रकारचे शिबिर महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करून त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणारे ठरणार आहे.

महालक्ष्मी हॉस्पिटलच्या वतीने सर्व महिलांना या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पाचोड व परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आरोग्य उपक्रमाचा लाभ घ्यावा.

## परळी रेल्वे स्टेशन ला आरोमा सींग ठाकुर यांची भेट प्रत्येक्ष पहानी करत प्रत्रकारांशी साधला संवाद

**आत्ताच एक्सप्रेस**
**परळी प्रतिनिधि** / परळी रेल्वे स्टेशन येथे सिकंदराबाद डिव्हिजन दक्षिण मध्ये रेल्वे आरपीएफ च्या आय जी अरोमा सिंग ठाकूर यांनी परळी रेल्वे स्थानक येथील आरपीएफ कार्यालयाला भेट दिली या भेटीत त्यांनी परळी येथील रेल्वे संरक्षण दलाच्या अधिकाऱ्यांशी आणि जवानांशी भेटून परळी रेल्वे स्थनक बद्दल माहिती घेतली नंतर पत्रकारांशी बोलताना अरोमा सिंग ठाकूर म्हणाल्या की परळी रेल्वे स्थानक हे दक्षिण मध्य रेल्वेतील एक मोठा रेल्वे स्थनक आहे या रेल्वे स्थानकावर प्रवाशांची आवक जावक जास्त आहे आणि या स्थानावर एकूण रेल्वे संरक्षण दलाच्या २१ जवानांची संख्या आहे संख्या कशी वाढवता येईल यावर आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांची बोलून चर्चा करेल नुकतीच परळी रेल्वे स्थानकवर ३१ ऑगस्ट रोजी एका सहा वर्षीय चिमुकडीवर बलात्काराची धक्कादायक घटना घडली होती त्या घटनेच्या मॅडमने पहिल्यांदा निषेध केला नंतर आम्ही भविष्यात रेल्वे स्थानक वर सुरक्षा वाढू असा आश्वासन दिला आणि भविष्यात असे घटना नाही घडेल हे पण सांगितले नंतर मॅडमनी स्टेशनची पाहणी केली आणि सुरक्षा विषयी काय उपक्रम राबता येईल हे बघितले.

टोटल परळी रेल्वे स्टेशन मध्ये नवीन स्टेशन इमारत पूर्ण झाल्यावर ३६ कॅमेरे लावण्यात येणार आहेत व विशेष या कॅमेरा मध्ये रेकॉर्ड वरचे गुन्हेगार यांनी स्टेशन परिसर व स्टेशनमध्ये आल्यास या कॅमेऱ्या द्वारे त्यांचे गुन्हेगार असल्याचे सायरन संबंधित कार्यालय आरपीएफ ऑफिस या ठिकाणी सिंगल मिळेल जेणेकरून गुन्हेगार व्यक्तींना गुन्हा करण्यापासून रोखण्यात रेल्वे आरपीएफ यांना यश येईल असे वरिष्ठ अधिकारी आईजी यांनी आज परळीत पत्रकार परिषद मध्ये सांगितले या वेळी उपस्थित पत्रकार धीरज जंगले,जगदीश शिंदे,बालाजी ढगे,बाबा शेख,प्रकाश वर्मा, दशरथ रोडे, मुक्रम शेख,शेख मुदस्सिर, सय्यद सबाहत अली आदि पत्रकार संपादक बांधव उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त स्वानंद सार्वजनिक वाचनालयात गथप्रदर्शन, व्याख्यान, चर्चासत्र संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज/ प्रतिनिधी/** स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगाव ता. केज जि. बीड येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान, चर्चासत्र इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.

सर्वप्रथम मराठवाडा मुक्ती संग्रमाचे प्रणेते, स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.

त्यानंतर ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान, चर्चासत्र कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ.अंजना गोविंद गायकवाड या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत अधिकारी डि.एस. सरदे, ग्रामपंचायत ऑपरेटर विजय थोरात, सहारीक्षक अभिजित शिंदे, सहारिकद सुर्यकांत धायतिडक, रवि गायकवाड यांची उपस्थिती होती.


यावेळी ग्रामपंचायत अधिकारी डि. एस. सरवदे यांनी गंथालयाच्या दैनंदिन कामकाजा बरोबरच विविध सामाजिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम राबवून गांवाला दिशा देण्याचे काम होत असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी विजय थोरात, अभिजित शिंदे, सुर्यकांत धायतिडक, रवि गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. उद्घाटणीय सत्राचा अध्यक्षीय समारोप सरपंच सौ.अंजना गोविंद गायकवाड यांनी केला.

दुसऱ्या सत्रात ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, परखड व्याख्याते प्राचार्य डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न झाले. आपल्या व्याख्यानात मराठवाडा निजामशाहीत असल्यामुळे मागास राहिला व विकासापासून वंचित राहिल्याचे सांगून जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात मराठवाडा १७ सप्टेंबरला मुक्त झाला. यासाठी अनेकांनी आपले बलिदान दिले आणि आपण हैद्राबाद च्या निजामशाहीती मुक्त झालो असे प्रतिवादन डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी केले. भावेळी विचारपीठावर कमलाकर साबळे, रविंद्र गायकवाड, विजय गायकवाड,आरुण गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्यानंतर घेण्यात आलेल्या चर्चासत्रात रामकृष्ण( तात्या) गायकवाड, रविंद्र गायकवाड, बापूराव गायकवाड, कमलाकर साबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान, चर्चासत्र




कार्यक्रमाल विठ्ठल भोगजकर, भास्कर गायकवाड, सुरेश घोगले, शिवाजी शिंदे, माणिकराव गायकवाड, बंडू पौळ, वेदिका गायकवाड, दिव्या साबळे, विरा सोनपणे, रमेशराव गायकवाड, माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, संजय सोनवणे, कृष्णराजे गायकवाड, यश गायकवाड, सोहम गायकवाड, कृष्णा गायकवाड, नारायण गायकवाड, हरिभाऊ गायकवाड, बबन पुंड, यांच्यासह वाचक, हितचिंतक, विद्यार्थी, युवक, जेष्ठ नागरीक यांची उपस्थिती होती

सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन, आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद( भैय्या ) गायकवाड यांनी केले.

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण









**- मराठवाड्याच्या सर्वांगिण विकासासाठी अथकपणे काम करू - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही**
**- स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून मुक्तीसंग्रामातील हुतात्म्यांना मुख्यमंत्री यांनी केले अभिवादन**
**-अतिवृष्टीमुळे नुकसान; राज्य सरकार तात्काल मदत देणार**
**-२०२३ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयांची गतीने अंमलबजावणी**

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ मराठवाड्याची सर्वांगिण प्रगती करण्यासाठी उद्योग आणि त्यातून रोजगार निर्मिती, कृषि, पायाभूत सुविधा विकास अशा सर्व क्षेत्रात अथकपणे काम करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मराठवाडा मुक्तीसंग्रामदिन कार्यक्रमात दिली.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दियानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या सिद्धार्थ उद्यानात मराठवाडा मुक्ती संग्राम स्मृतीस्तंभ येथे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मृतिस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. पोलीस दलातर्फे शस्त्र सलामी, मानवंदनेनंतर ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, राज्यसभा सदस्य खासदार डॉ. भागवत कराड, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार संदिपान भुमरे, आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, प्रशांत बंब, प्रदीप जयस्वाल, विलास भुमरे, आमदार श्रीमती संजना जाधव, विधान परिषदेचे माजी विरोधी पक्ष-नेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत, पोलीस आयुक्त प्रविण पवार, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणा-ले, निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी मोठा लढा उभारला, यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवीनारायण रेड्डी, देवीसिंगजी चव्हाण, भाऊसाहेब वैशपायन, शंकरसिंग नाईक, विजेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे, काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्धन होरटीकर गुरुजी, सूर्यभान पवार, विनायकराव चारठाणकर अशा अनेक जणांनी स्वातंत्र्यसंग्रामात पुढाकार घेऊन काम केले. त्यांच्यासोबत असंख्य लोकांनी रझाकारांच्या जुलमातुन मराठवाड्याला मुक्त केलं आणि भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या निष्पत्तीतून भारत स्वतंत्र झाल्यानंतर जवळपास १३ महिने हा रणसंग्राम चालला आणि त्यातून मराठवाड्याला मुक्ती मिळाली आणि म्हणूनच हा दिवस केवळ मराठवाड्याच्या मुक्तीचा दिवस नाही आहे तर एकसंघ भारत निर्मितीचा दिवस म्हणून देखील या दिवसाकडे आपण पाहू शकतो. या सर्व लोकांचा आदर ठेवत मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्न करणे आपले कर्तव्य आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

अतिवृष्टीमुळे नुकसान; राज्य सरकार तात्काळ मदत देणार

मराठवाड्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली असून अतिवृष्टीमध्ये आपले बंधू-भगिनी दगावले त्यांना श्रद्धांजली अर्पण करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्वांना राज्य सरकारच्या वतीने तात्काळ मदत देण्यात येईल आणि मराठवाड्यातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकरी किंवा गावकरी त्याच्या पाठीशी हे सरकार निश्चितपणे उभे राहील, अशी ग्वाही दिली.

मराठवाड्याचा दुष्काळ भूतकाळ करायचा आहे, यासाठी कृष्णा खोऱ्यातले पाणी हे मराठवाड्यापर्यंत आणले. दुसऱ्या टप्प्यामध्ये सांगली आणि कोल्हापूरचे पुराचे पाणी हे पुन्हा उजनीपर्यंत आणून ते मराठवाड्यात आणण्यात येणार आहे. उल्हास खोऱ्याचे ५४ टीएमसी पाणीदेखील मराठवाड्यामध्ये आणण्यात येईल. गोदावरीचे खोरे आहे जे तुटीचे खोरे आहे हे खोरे त्यातली तूट दूर करून यासंदर्भात प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत हे पाणी पोहोचवण्याचे काम निश्चितपणे सरकारच्या माध्यमातून केले जाईल. डिसेंबरपर्यंतचा डीपीआर तयार होईल आणि त्यानंतर जानेवारी- फेब्रुवारी मध्ये याचे निविदा प्रक्रिया पार पाडली जाईल असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

२०२३ मध्ये झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयांची गतीने अंमलबजावणी

छत्रपती संभाजीनगर येथे २०२३ मध्ये झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाची गती-ने अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

घृष्णेश्वर मंदिराला ६१ कोटी रुपये दिले आहेत, तुळजाभवानी मंदिर ५४१ कोटीची तरतूद केली तर औंढा नागनाथ आराखड्याला मंजुरी दिली आहे. मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत ९४ बसगाड्या दिल्या असून छत्रपती संभाजीनगरला जवळपास ११५ बसेस दिल्या आ-हेत. ९१६ अंगणवाड्यांची सुरुवात केली, २६५०० नवीन बचतगट तयार करून त्यामध्ये २.७० लाख महिलांना जोडले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेचे अंतर्गत ९५ कोटीचा निधी वितरित केला. विविध स्मारके, मंदिरे यासाठी २५३ कोटी रुपये दिले, ३१२१ कोटीच्या रस्त्यांची कामे सुरू केली, जी प्रगतीपथावर आहेत. हायब्रिड न्युनिटीमधील ७७१९ कोटींची कामे आपण सुरू केली, बीड जिल्हा परिषदेच्या इमारतीचे ७० टक्के काम पूर्ण केले आहे. जवळपास चार लाख सिंचन विहिरी पैकी ३० हजार विहिरी पूर्ण केल्या, आणि १.१४लाख एवढ्या सिंचन विहिरीचे काम सुरू केले आहे. मंत्रिमंडळाची बैठक ही केवळ एक औपचारिकता नव्हती तर त्यात घेतलेल्या एकेका निर्णयावर कार्यवाही करण्याचे काम सुरू असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी त्या ठिकाणी २७०० कोटी रुपयांची योजना सरकारने मंजूर केली आणि महानगरपालिकेचा ८०० कोटीचा हिस्सा देखील या ठिकाणी भरण्याचा निर्णय घेतला. समृद्धी महामार्ग आणि डीएमआयसीमुळे आज सर्व गुंतवणूकदारांना अतिशय महत्त्वाचे स्थान ज्याला आपण आवडीचे स्थान म्हणू शकतो ते आता छत्रपती संभाजीनगर झाले आहे. ह्युंडाई कंपनीची या ठिकाणी आलेली गुंतवणूक हेच दर्शवते. काही वर्षांमध्ये झालेली गुंतवणूक पाहिली तर आता छत्रपती संभाजीनगर हे इलेक्ट्रिक वाहनांच्यासाठी देशाची राजधानी बनते आहे.

लातूरची कोच फॅक्टरी आता अंतिम टप्प्यामध्ये आहे. जवळपास १४ हजार लोकांना त्या ठिकाणी रोजगार मिळणार आहे. छत्रपती संभाजीनगरच नाही तर मराठवाड्याच्या इतर भागात जे आपलं काम चालले आहे ते विकासाच्या दृष्टीने महत्व-पूर्ण आहे. अहिल्यानगर पासून बीड पर्यंतची रेल्वेचे स्वप्न हे आज पूर्ण करण्याचे काम आपल्या शासनाच्या माध्यमातून होत आहे.

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वामध्ये महायुतीचे सरकार मराठवाड्याच्या हितासाठी आणि मराठवाड्याच्या प्रगतीसाठी काम करत राहील आणि हे करत अस-ताना आपल्या सगळ्यांचा आशीर्वाद आणि आपल्या सगळ्यांच्या सूचना या आमच्यासाठी अत्यंत मोलाच्या ठरतील, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी कार्यक्रम स्थळी उपस्थित असलेल्या स्वतंत्र संग्राम सेनानींची भेट घेऊन त्यांना मराठवाडा मुक्ती दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी मराठवाडा मुक्ती संग्रामात योगदान दिलेल्या स्वात्रंत्र्यसैनिकांचे कुटुंबीय, नागरिक, सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त संचालक माहिती कार्यालयात ध्वजारोहण





**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या येथील संचालक माहिती कार्यालयात संचालक किशोर गांगुर्डे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

संचालक माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय व माहिती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमास जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, माहिती अधिकारी डॉ.मीरा ढास, सहायक संचालक गणेश फुंदे आदींसह संचालक कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, माहिती केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

## कडेठाण परिसरात मोबाइल नेटवर्क सेवा दोन महिन्याने विस्कळीत;

### रिचार्ज कंपनीकडून ग्राहकांची एक प्रकारची लूट सुरुच




**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण /विशेष प्रतिनिधी/ शिवाभाऊ दौंड**/ पैठण तालुक्यातील कडेठाण संपूर्ण परिसरात मोबाईल नेटवर्क सेवेत सातत्याने व्यत्यय येत असल्याने ग्राहक कमालीचे त्रस्त झाले आहेत. गेल्या दोन महिन्यापासून नागरीकांना मोबाईल नेटवर्क मिळत नसल्याने मनस्ताप सहन करावा लागत असून मोठ मोठी रकमेचे रिचार्ज करून कंपनीकडून ग्राहकांची एक प्रकारची लूटच सुरू आहे. असा आर-ोप ग्राहकांनी केला. कडेठाण मध्ये तिन कंपनीचे टॉवर असुन ते टॉवर शोभेची वस्तू झाली आहेत. आयडीया वोडाफोन, एअरटेल आणि जीओ कंपन्याची ग्राहक संख्या परिसरात मोठी आहे. सध्या मोबाईल स्क्रीन वर रेन्ज दिसते परंतू कॉल लागत नाही. दहा वेळेस प्रयत्न करून फोन न लागणे, फोन लागल्यावर चिञ विचिञ आवाज येणे, फोन मध्येच कट होणे अशा अनेक तक्रारी सतावत आहेत. तसेच रेशन दुकानदारांनाही पॉज मशीन मोठी कसरत करावी लागत असल्याने ग्रांहकांना कित्येक वेळ दुकान समोर ताटकळत बसावे लागत आहे. दरम्यान, सध्या ग्रामीण भागात प्रत्येक तरुणाच्या हातात ॲनराईड मोबाईल आहे. सोशल मिडीयाचा तुफान वापरामुळे विविध योजनाचे चॉकलेट कंपन्याकडून देण्यात येते याचाच एक भाग पोर्ट आऊट करून कंपनी बदलून घेण्याची स्पर्धाच लागल्याचे चिञ आहे. नेटवर्क मिळत नसल्यामुळे बँकिग सेवा, सेतू सुविधा केद्र ऑनलाईनच्या माध्यमातून कॅशलेश व्यवहार करणारे छोटे मोठे व्यापारी व ऑनलाईन अभ्यास करणारे विद्यार्थांना ञास होत आहे. दरम्यान, दुष्काळी अनुदान केव्हायसी प्रकिया नेटवर्कच्या सततच्या खंडामुळे ठप्प आहे. बँकीग कामावर याचा मोठा परिणाम आहे. दोन दिवसापूर्वी झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्या नुकसानीचे नोटकॅम फोटो काढून इन्शुरन्स कंपनीला ७२ तासात पाठवणे गरजेचे असते ते अपलोड करतांना शेतकऱ्यांना मोबाईल नेटवर्क नसल्याने खूप अडचणी येत आहे.असं शेतकरी यांनी सांगितले.

## वनपरिक्षेत्रात अवैध उत्खनन करणाऱ्या जेसीबीवर वन विभागाची धडक कारवाई



**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड उदय कुलकर्णी** / तालुक्यातील कळंकी वनपारिक्षेत्रात राखीव असलेल्या वन कक्ष क्र.१२३ मधील ग.क्र.१६४ मध्ये दि.१५ रोजी एक जेसीबी चालक मालक आपल्या जेसीबीच्या सह्याने अवैधरित्या उत्खलनन करीत असल्याचे वन विभागाच्या कर्मचारी वर्गाचे दृष्टीस येताच त्यांनी आपल्या वरिष्ठांच्या साह्याने सापळा रचून जेसीबी मालक चालक यास जेसीबीसह अटक करून गुन्ह्याची नोंद केली आहे.

सदरची धडक कार्यवाई वनविभागाचे सर्वेसर्वा वनपारिक्षेत्र अधिकारी श्री.शिवाजी टोम्पे,उप वनर-क्षक श्रीमती सुवर्णाताई माने,सहाय्यक वन संरक्षक विशाल कवडे यांचे मार्गदर्शनाखाली कळंकी वन परिमंडळ क्षेत्राचे सर्वेसर्वा वन- अधिकारी श्री.एस. पी.कादी, मौजे कळंकी वनरक्षक श्रीमती वैषालीताई तुपे, कळंकी पूर्व,पेडकवाडी वनविभागाचे वनरक्षक ,श्री.ए.एल. नागरगोजे, जामडी वन- विभागाच्या वनरक्षक श्रीमती यशोदाताई साळवे,वन मजूर देविदास राठोड,विभागाचे वाहन चालक भाऊसाहेब वाघ यांनी उत्तर रात्रीपर्यंत ही धडक कार्यवाई केली असुन पुढील अधिकचा कसून तपास वनपरिमंडळ अधिकारी श्री.एस. पी.कादी हे करीत आहे.

पुढे त्यांनी असे सूचित केले आहे की,वन-परिक्षेत्रात वीणा परवानगी प्रवेश करणे,अवैध मुरूम, माती,गारगोटी ई. मौल्यवान खनिजांचे अवैद्य उत्खलन करणे कायद्याने गुन्हा असुन या विभागात ट्रॅक्टर, टेम्पो किंवा इतर वाहनांनी या वनात वीणा परवानगी प्रवेश करू नये नसता त्यांचेवर वन विभागाचे कायद्या अंतर्गत कठोरातली कठोर कार्यवाई करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.

## पैठण औद्योगिक केंद्र येथील अग्निशमन दलाला मराठवाडा मुक्ती संग्रामाचा विसर




**आत्ताच एक्सप्रेस**
**पिपंळवाडी/ प्रतिनिधि/ हारुन/ शेख** / दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात मुक्ती संग्राम दिन संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षीही (२०२५) मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात आला असून, विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मात्र पैठण एम डीसी येथील अग्निशमन दलाला याचा विसर पडला आहे. १७ सप्टेंबर मराठवाड़ा मुक्ती संग्राम दिन. हा दिवस केवळ एक सुट्टी नसुन,मराठवाडयाचा स्वातंत्र्य अणि अस्मितेचे प्रतीक आहे. आजपासुन ७७ वर्षापुवी , याच दिवशी मराठवाडयाने हैदराबादच्या निजामाच्या राजवटीतुन मुक्त होऊन भारतीय संघराज्यात प्रवेश केला.भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले असले तरी मराठवाड़याला मात्र त्यासाठी आणखी १३ महिने संघर्ष करावा लागला.हा संघर्ष हा त्याग आणि हे बलिदान आपल्या सर्वासाठी प्रेरणादायी आहे.

## नादरपूर येथील मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ग्रामसभा ....




**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम**/ कन्नड तालुक्यातील नादरपुर येथे १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय नादरपूर ता. कन्नड येथील ध्वजारोहण सकाळी ठिक :-७-३० वा.नादरपूर येथील जेष्ठ नागरिक सन्माननीय नारायण नामदेव वाघ यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले व मध्यवर्ती सहकारी बँक नादरपूर येथील ध्वजारोहण गा-वातील जेष्ठ नागरिक शेषराव मुकुंदा निकम यांचे हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नादरपूर येथील शाळेचे ध्वजारोहण शाळेचे मुख्याध्यापक ए. एस. गाडेकर यांचे हस्ते करण्यात आले ध्वजारोहण झाल्यानंतर जि प्र प्राथमिक शाळेतील विध्यार्थ्यांनी भाषणे सादर केली.त्यानंतर सकाळी ठिक ९:३० वा. मारोती मंदिर सभागृह येथे शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान बाबत किसन खंडू निकम ग्रामपंचायत सदस्य यांचे अध्यक्षतेखाली व सन्माननीय श्रीयुत एम.व्ही. देशपांडे संपर्क अधिकारी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान पंचायत समिती कन्नड यांचे उपस्थितीत ग्रामसभा घेण्यात आली. त्यात समिती गठीत करून अभियान राबविण्याचे ठरले

याप्रसंगी तंटा मुक्ती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, शालेय समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, सोसायटी व्हा. चेअरमन, सदस्य, शाळेचे मुख्यद्यापक, शिक्षक, बँकचे कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी,आरोग्य सेविका, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस,पोलीस पाटील, कोतवाल, विध्यार्थी पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालय येथे ध्वजारोहण





**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालय येथे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, सहआयुक्त देविदास टेकाळे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री.पापळकर यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

## मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा

# मराठवाड्यातील सामाजिक सलोख्याची वीण विसकटू देणार नाही - पालकमंत्री पंकजाताई मुंडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ मराठवाडा ही संताची भूमि आहे. संत विचार सरणीतुन आपण माणुसकी जोपासली आहे. आपण देश व मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी लढलो आहोत. आताच्या काळात वंचितांचा व सामान्यांचा वाणी व वाली होवून लढले पाहिजे. तरी मराठवाड्यातील सामाजिक सलोख्याची वीण विसकटू देणार नाही, अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली.

मराठवाडा मुक्तिसंग्राम वर्धापन दिनानिमित्त जालना शहरातील टाऊन हॉल येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जनतेला उद्देशून शुभेच्छा संदेश देताना त्या बोलत होत्या. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक यांची उपस्थिती होती.

प्रारंभी टाऊन हॉल परिसरात लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन मान्यवरांनी अभिवादन केले. यानंतर हुतात्मा स्मारक स्मृती स्तंभास पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. तर पोलिस जवानांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व पोलिस बँड पथकाने शोकधून वाजवून हुतात्म्यांना मानवंदना दिली.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त उपस्थित सर्वांना शुभेच्छा देताना पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या लढ्याला अनन्य साधारण महत्व आहे. आजच्या या मंगल दिनी मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या लढ्यात सक्रिय सहभाग असलेले महान हुतात्मे आणि स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, या लढ्यातील हुतात्मे आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या पराक्रमांचा इतिहास सुवर्ण अक्षराने लिहून ठेवावा असाच आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामात ज्या महाराष्ट्र परिषदेचे महत्वाचे योगदान आहे. त्याची सुरुवात जालना जिल्ह्यातील परतूर येथील महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनापासून झाली होती. मुक्तीसंग्रामात कोलते पिंपळगावकरांचे मोठे योगदान आहे. निजामाच्या अत्याचारातून मराठवाडा मुक्त करण्यासाठी पिंपळगावकरांनी रझाकारांविरुध्द २२ जून, १९४८ रोजी सशस्त्र लढा दिला होता. तसेच जालना जिल्ह्यात विविध ठिकाणी झालेले जंगल सत्याग्रह देखील खूपच गाजले होते. मुक्तीसंग्रामासाठी जालना जिल्ह्यातील जनतेने प्रचंड त्याग व बलिदान देवून हा लढा यशस्वी केला होता. मराठवाड्याची झाशीची राणी लक्ष्मीबाई या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जालना जिल्ह्यातील दगडाबाई शेळके यांनीही अनेक ठिकाणी निजाम विरोधी सशस्त्र लढे दिले. या लढ्याचा मुख्य हेतु हा राष्ट्रीयता आणि लोकशाहीची भावना वाढविणे हा होता.












मराठवाडा मुक्तीसंग्रामात निजामाच्या जूलमी हुकूमशाही विरोधात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या संपुर्ण आयुष्याची आहुती देवून मराठवाड्याला निजामाच्या गुलामगिरीतून मुक्त केले. मराठी भाषा, मराठी संस्कृती, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक व राजकीय हक्क प्राप्तीसाठी या भागातील जनतेने जो त्याग केला, तो सुवर्ण अक्षरांनी लिहावा असाच आहे.

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होण्यासाठी पंतप्रधान राष्ट्रनेता नरेंद्रजी मोदी साहेब यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत सेवा पंधरवाडा राबविण्यात येणार आहे. स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचे आयोजन करण्यात आले असून दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत विशेष महिला आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानअंतर्गत ग्राम विकास विभागाच्यावतीने या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत असून ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्राम पंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषदांना कामगिरीनूसार प्रोत्साहित करण्यासाठी हे अभियान सुरु करण्यात आले आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक यांच्यासह त्यांच्या वारसांची तसेच जिल्ह्यातील वीर माता, वीर पत्नी यांची पालकमंत्री मुंडे यांनी भेट घेत त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली व त्यांचा यथोचित सत्कार केला.

यावेळी नागरिकांना शासनाच्या घरपोच सेवा देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या 'जालना मित्र' पोर्टलचे पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी सुचिता सुत्रावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## शेतकऱ्याच्या बांधावर जावून पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी केली नुकसानीची पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील मात्रेवाडी गाव परिसरात शेतकऱ्याच्या बांधावर प्रत्यक्ष जावून पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी शेती पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. पावसामुळे उभी पिके जमिनदोस्त झाली असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. बदनापूर तालुक्यातील मात्रेवाडी येथील शेतकरी जनार्धन मात्रे यांच्याशी संवाद साधत झालेल्या पिक नुकसानीची माहिती जाणून घेतली. शासन नुकसानग्रस्ताच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून काळजी करु नका अशा शब्दांत बाधित शेतकऱ्यांना धीर दिला. यावेळी त्यांनी तुर, कापुस व सोयाबीन या पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच या सर्व नुकसानीचे पंचनामे तातडीने करुन शेतकऱ्यांना मदत देण्याचे आदेश संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच अतिवृष्टीने बाधित पिकाने अतोनात नुकसान झाले असून शासन शेतकऱ्यांना सर्वो तोपरी मदत करणार असल्याचे मत पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी आमदार नारायण कुचे, भाऊसाहेब घुगे, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, नायब तहसीलदार श्री. राजमाने यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.





### पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी केली जालना शहरातील विविध भागात पाहणी

मराठवाडा मुक्तिसंग्राम वर्धापन दिनानिमित्त जालना शहरातील टाऊन हॉल येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण झाल्यानंतर पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी जालना शहरातील महापालिकेसमोरील परिसरातील शिवशक्ती ग्रीन सिटीत अतिवृष्टीने सखल भागात पावसाचे पाणी साचलेल्या भागातील रहिवासी भेट घेवून विचारपूस केली तसेच रेल्वे स्थानकाशेजारील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर येथील घरामध्ये पाणी साचलेल्या भागाची पाहणी केली. अतिवृष्टीने घरांचे खुप मोठे नुकसान होवून घरात पाणी शिरले आहे. या संकटात सापडलेल्या रहिवाशांना अन्न व इतर आवश्यक बाबी पुरविण्याबाबत जिल्हा प्रशासनाला नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

## अंबड व घनसावंगी ऊस उत्पादक शेतकरी व कामगार संघर्ष समितीची निदर्शने

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड प्रतिनिधी** / अंबड व घनसावंगी ऊस उत्पादक शेतकरी व कामगार संघर्ष समितीने कामगारांच्या थकीत वेतनासाठी आणि इतर मागण्यांसाठी आवाज उठवला आहे. समितीने साखर कारखाना प्रशासनावर गंभीर आरोप करत, कामगारांना वेळेवर वेतनवाढ आणि महागाई भत्ता दिला जात नसल्याचे म्हटले आहे. १७ सप्टेंबर २०२५ रोजी समितीने दिलेल्या निवेदनानुसार, १ एप्रिल २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाने, कामगार प्रतिनिधी आणि साखर कारखानादार यांच्यात झालेल्या बैठकीत कामगारांना १० टक्के वेतनवाढ देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार, कामगारांना २५०० ते २६०० रुपये वेतनवाढ मिळणे अपेक्षित होते. परंतु, कुठल्याही साखर कारखान्याने या आदेशाची अंमलबजावणी केली नाही. विशेषतः, कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना, लि., अंकुश नगर या कारखान्याने या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप समितीने केला आहे. समितीने केलेल्या आरोपांनुसार, कामगारांना नियमित वेतनवाढ दिली जात नाहीये, तसेच महागाई भत्ताही देण्यात येत नाही. याचा थेट परिणाम कामगारांच्या आर्थिक परिस्थितीवर होत आहे. याव्यतिरिक्त, कामगारांच्या कल्याण मंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व अधिकारांपासून त्यांना वंचित ठेवले जात आहे, असेही निवेदनात म्हटले आहे. संघर्ष समितीच्या वतीने, कामगार प्रतिनिधींनी या प्रकरणी महाराष्ट्र शासन आणि साखर कारखाना प्रशासनाकडे न्याय मागितला आहे. १ एप्रिल २०२४ पासूनची थकीत वेतनवाढ त्वरित द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या गंभीर प्रश्नावर प्रशासनाने लवकर लक्ष घालून कामगारांना त्यांचे हक्क मिळवून द्यावेत, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही समितीने दिला आहे.

## लासुर स्टेशन येथे जिल्हा परिषद शाळा व सावंगी ग्रुप ग्रामपंचायतसह विविध ठिकाणी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला....

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर प्रतिनिधी**/ गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे जिल्हा परिषद शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त प्रियंका गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.सर्वप्रथम सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष फिरोज मन्सूरी रईस जहागीरदार साळुंखे बाबा रईस शेख मुख्याध्यापक प्रशांत देसाई तुपे सर मेंडके सर शिक्षक शिक्षिका विद्यार्थी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच सावंगी ग्रुप ग्रामपंचायत येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त उपसरपंच संपत छाजेड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी ग्रामसेवक आर जी गायकवाडसह ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी तलाठी जाधव आप्पा हे उपस्थित होते..... दरम्यान भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास मांडताना आपण केवळ परकीय सत्तेविरुद्ध झालेल्या राजकीय संघर्षाचा विचार करतो. पण हा इतिहास तेवढ्यापुरता मर्यादित नाही; तो समाजातील विविध स्तरांतील असमानता, शोषण, जातिभेद, धार्मिक दडपशाही आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध झालेल्या संघर्षाचाही आहे. भारतात १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्याचा सूर्य उगवला, पण या स्वातंत्र्याच्या किरणांचा लाभसर्व भारतीयांना एकसमानपणे झाला नाही. ब्रिटिश साम्राज्याचे जोखड झुगारून देश स्वतंत्र झाला, तरी हैदराबाद संस्थान निजामाच्या ताब्यात होते. त्याच्या हुकूमशाही वृत्तीमुळे आणि रझाकारांच्या दहशतीमुळे मराठवाडा अजूनही गुलामगिरीतच होता. निजामशाहीच्या राजवटीतील अन्याय, रझाकारांची दहशत आणि सामाजिक-आर्थिक शोषण यांचा भोग मराठवाड्यातील सामान्य माणसाला करावा लागत होता. त्यामुळे मराठवाडा मुक्तीसंग्राम हा केवळ राजकीय स्वातंत्र्याचा नव्हे तर सामाजिक न्याय व लोकशक्तीचा लढा ठरला. म्हणूनच मराठवाड्याला खरी मुक्ती १७ सप्टेंबर १९४८ रोजी मिळाली. हा मुक्तीसंग्राम केवळ राजकीय विलिनीकरणाचा प्रश्न नव्हता, तर सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि लोकशाही मूल्यांसाठी झालेला व्यापक संघर्ष होता...





## स्वस्थ नारी, सशक्त परिवार याअभियानांतर्गत महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी, ग्रामीण रुग्णालय जाफराबाद येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ डी एम पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमास शुभारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जाफराबाद प्रतिनिधी** / जाफराबाद तालुक्यातील महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढविणे आणि त्यांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष अभियान १७ सप्टेंबर ते २ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामीण रुग्णालय जाफराबाद येथील डॉ वैद्यकीय अधीक्षक डॉ डी एम पाटील यांनी केले आहे.

या शिबिरांमध्ये ग्रामीण व शहरी भागातील महिलांसाठी मोफत तपासणी, उपचार आणि समुपदेशन सेवा पुरविण्यात येणार आहे. यामध्ये महिलांच्या मुखाचा, स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी तपासणी, रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन तपासणी केली जाणार आहे. गर्भवती महिलांची प्रसूती संबंधी तपासणी, गर्भधारणाविषयी मार्गदर्शन तसेच किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता, पोषण, लसीकरण, याबाबत जनजागृती करून त्यांना आरोग्याविषयी योग्य समुपदेशन दिले जाणार आहे.

याशिवाय महिलांची एनसीडी तपासणी, मानसिक आरोग्य तपासणी तसेच इतर सर्वसामान्य आजारांवरील तपासणी, उपचार व मार्गदर्शन मोफत केले जाणार आहे.

हिमोग्लोबिनइलेक्ट्रोफोरेसीस तपासणी आणि आवश्यक औषधोपचार पुरविण्यात येणार आहेत. अभियानादरम्यान ग्रामीण रुग्णालय येथे दिनांक २६.०९.२०२५ रोजी ,या शिबिरांत तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली महिलांचे आरोग्य तपासले जाईल. असे वैद्यकीय अधीक्षक डॉ डी एम पाटील, कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते.

अभियानात जिल्ह्यातील सर्व सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि आरोग्यवर्धिनी केंद्रे सहभागी होणार आहेत. मोहिमेमुळे महिलांना गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन वेळेवर उपचार सुरू करण्यास मदत होईल.

म्हणून ग्रामीण रुग्णालयात महिला कर्मचारी व अधिकारी यांची हिमोग्लोबीन तपासणी व ब्लड ग्रुप तपासणी करण्यात आली.या कार्यक्रमात रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ डी एम पाटील, कार्यालयीन अधीक्षक श्री शिवाजी नवले, वैद्यकीय अधिकारी डॉ सावित्रा कदम, डॉ.नितिन पाटील,डॉ प्रल्हाद जाधव,आणि वैद्यकीय अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.







हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813